RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ६, अंक ४९] गुरुवार, सप्टेंबर १०, २०२०/भाद्र १९, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ८०**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक आरोग्य विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, १० वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक १० सप्टेंबर २०२०.

### अधिसूचनेचा मसुदा

क्रमांक राकायो. २०१५/प्र.क्र. १५०/राकावि-२.— कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ (१९४८ चा ३४) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम (१) च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि आस्थापनांमध्ये कामावर ठेवलेल्या व्यक्तींच्या संख्येच्या संदर्भात, याबाबतीत काढलेल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचनांचे अंशतः अधिक्रमण करून, कर्मचारी राज्य विमा महामंडळाशी विचारविनिमय करून आणि केंद्र सरकारची मान्यता घेऊन, कलम १ च्या उक्त पोट-कलम (५) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे एक महिन्याची नोटीस देऊन, उक्त अधिनियमाच्या कलम (१) च्या पोट-कलम (३) अन्वये, ज्या क्षेत्रांमध्ये उक्त अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यात आल्या आहेत त्या क्षेत्रांमध्ये स्थित आहेत अशा आणि जेथे दहा किंवा त्याहून अधिक व्यक्ती कामावर ठेवलेल्या असतील, किंवा मागील बारा महिन्यांच्या काळात कोणत्याही दिवशी कामावर ठेवलेल्या होत्या अशा, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या आस्थापनांच्या वर्गांना उक्त अधिनियमाच्या सर्व तरतुदी ज्या दिनांकास लागू करण्यात येतील तो दिनांक म्हणून १ ऑक्टोबर २०२० हा दिनांक याद्वारे नियत करीत आहे.

**अनुसूची**

| अनुक्रमांक<br>(१) | आस्थापनांचे वर्ग<br>(२) |
|---|---|
| १ | दुकाने |
| २ | हॉटेले |
| ३ | उपाहारगृहे |
| ४ | मार्ग मोटार परिवहन आस्थापना |
| ५ | पुनर्विलोकन नाट्यगृहांसह सिनेमा |
| ६ | श्रमिक पत्रकार व अन्य वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम (१९५५ चा ४५) याच्या कलम २ (घ) मध्ये व्याख्या केलेल्या वृत्तपत्र आस्थापना. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**र. र. गढरी,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital Complex, 10th Floor, Mantralaya
Mumbai 400 001, dated the 10th September 2020.

### *DRAFT NOTIFICATION*

No. ESIS 2015/C.R. 150/RAKAVI-2.— In exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 1 of the Employees' State Insurance Act, 1948 (34 of 1948), in its application to the State of Maharashtra and in partial supersession of all earlier notifications issued in this behalf with respect to the number of persons employed in the establishments, the Government of Maharashtra, in consultation with Employees' State Insurance Corporation and with the approval of the Central Government, after having given one month notice as required by said sub-section *(5)* of section 1, hereby appoints the date 1st October 2020, to be the date on which all the provisions of the said Act shall extend to the classes of establishments mentioned in column (2) of the Schedule appended hereto wherein ten or more persons are employed, or were employed on any day of the preceding twelve months situated in the areas in which the provisions of said Act have been brought into force under sub-section *(3)* of section 1 of the said Act.

*Schedule*

| Sr. No.<br>(1) | Classes of Establishments<br>(2) |
|---|---|
| 1 | Shops |
| 2 | Hotels |
| 3 | Restaurants |
| 4 | Road Motor Transport Establishments |
| 5 | Cinema including preview theatres |
| 6 | Newspaper establishments as defined in section 2 (*d*) of the Working Journalists (Condition of Service) and Miscellaneous Provisions Act (45 of 1995). |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. R. GADHARI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.